ePaper

| वर्ष - 7 । अंक - 173 | UDYAM-MH-26-0158827 |

# दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवालांना ईडीचं समन्स!



महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- महाराष्ट्राची तेजस्वी कामगिरी!
- आला रे आला 'सिम्बा' आला!
- ममता बॅनर्जींना झटका!
- मराठ्यांना तातडीने प्रमाणपत्र!


www.mahaenews.com । मंगळवार, दिनांक 31 ऑक्टोबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## बीडमध्ये जाळपोळ, बसेसची तोडफोड, अखेर जिल्हाधिकाऱ्यांचा मोठा निर्णय, संचारबंदी लागू

# मराठा पेटला!

» दोन आमदारांच्या घरांना हॉटेल आणि कार्यालयाला आग लावली

।बीड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरु असलेल्या आंदोलनाला बीड जिल्ह्यात हिंसक वळण लागलं आहे. जिल्ह्यात पाच ते सहा ठिकाणी जाळपोळीच्या घटना घडल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार प्रकाश सोळंके, आमदार संदीप क्षीरसागर, जयदत्त क्षीरसागर यांच्या बंगल्याला आग लावण्यात आली. माजलगाव नगरपरिषदेच्या कार्यालयाला आग लावण्यात आली. अग्निशमन दलाची गाडी देखील पेटवण्यात आली आहे. बीड- छत्रपती संभाजीनगर मार्गावरील एक हॉटेल देखील पेटवण्यात आलं आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी मोठा निर्णय घेतला आहे. बीड जिल्ह्यात संचारबंदी लागू करण्यात आली आहे.






## जिल्हाधिकाऱ्यांनी आदेशात काय म्हटले आहे

» बीड जिल्हयात मराठा समाजास सरसकट कुणबी आरक्षण देण्याबाबतच्या अनुषंगाने जिल्ह्यातील विविध भागात आंदोलन, उपोषण चालू आहेत. २९ ऑक्टोबरच्या मध्यरात्रीपासून या आंदोलनाने उग्र स्वरुप धारण केले आहे. जिल्ह्यात परिवहन महामंडळ व इतर शासकीय अधिकाऱ्यांच्या वाहनास आग लावण्याचे प्रकार घडले आहेत. ज्याअर्थी आज ३० ऑक्टोबर रोजी आंदोलकांनी विविध शासकीय कार्यालयांवर मोर्चे काढून कार्यालये बंद केली व काही ठिकाणी कार्यालयास आगी लावणे व दगडफेक करणे असे प्रकार घडले आहेत. यामुळे सार्वजनिक व खाजगी मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. बीड जिल्हयात चालू असलेल्या आंदोलनामुळे सार्वजनिक आणि खाजगी मालमत्तेस मोठ्या प्रमाणावर हानी पोहोचत आहे. याबाबत मी स्वतः खात्री केलेली आहे. त्यामुळे जिल्ह्यात संचारबंदीचे आदेश लागू करण्याच्या निर्णयाप्रती मी आले आहे, असं दिपा मुधोळ मुंडे यांनी म्हटलं.

## बीड बसस्थानकातील बसेस फोडल्या...

» बीड बस स्थानकात जवळपास शंभरहून अधिक बस या उभ्या आहेत. मात्र, काल सायंकाळी या बसेस मराठा आंदोलकांनी फोडल्या आहेत. बसस्थानकातील दोन बस जाळण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र या बसेस जाळण्याचा प्रयत्न फसला आहे. यामध्ये पन्नासहून अधिक बसेसची तोडफोड करण्यात आली आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला सोमवारी बीडमध्ये हिंसक वळण लागलं. जिल्ह्यात पाच ते सहा ठिकाणी जाळपोळीच्या घटना घडल्या आहेत. आमदार प्रकाश सोळंके, आमदार संदीप क्षीरसागर, जयदत्त क्षीरसागर यांच्या घरांना आग लावण्यात आली. माजलगाव नगरपरिषदेच्या कार्यालयालाही लावली. त्यापार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी मुधोळ मुंडे यांनी संचारबंदीचा निर्णय घेतला आहे.

## सकल मराठा समाजाच्यावतीने सातारा बंदची हाक...

» मराठा आरक्षणाचा मुद्दा सध्या चांगलाच पेटला आहे. त्यातच राज्यात अनेक ठिकाणी आंदोलनं अधिक तीव्र होत चालल्याचं पाहायला मिळत. त्याच पार्श्वभूमीवर मंगळवार (31 ऑक्टोबर) रोजी सातारा बंदची हाक देण्यात आलीये. त्यामुळे सातारा जिल्हा हा बंदचा निर्णय घेण्यात आला आहे. जरांगे पाटलांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी आणि मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी सकल मराठा समाजाची बैठक ठेवण्यात आली होती. याच बैठकीत जिल्हा बंदचा निर्णय घेण्यात आला आहे. या बंदमध्ये सातारा जिल्ह्यातील सर्व दुकाने बंद ठेवण्यात येणार असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. तसेच सकल मराठा समाजाच्या वतीने एसटी, महामार्ग बंद ठेवण्यास देखील प्रयत्न करण्यात येणार असल्याचं म्हटलं जात आहे. त्यामुळे आता आजचा हा सातारा बंद पाळण्यात येणार का हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## मराठवाड्यातील तीन हजार गावांमध्ये आंदोलन



मराठवाड्यातील जवळपास तीन हजार गावांमध्ये आंदोलन करण्यात येत आहे. यापैकी बहुतांश गावांमध्ये राजकीय नेत्यांना गावात येण्यास बंदी घालण्यात आली आहे. आंदोलकांनी बसवर लावण्यात आलेल्या 'गतिमान' सरकारच्या जाहिरातीतील पंतप्रधानांसह मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या छायाचित्रांना काळे फासले.

## मराठवाड्यातील आंदोलने

- छत्रपती संभाजीनगर – 540 गावे
- जालना – 290 गावे
- परभणी – 2250 गावे
- हिंगोली – 250 गावे
- बीड – 400 गावे
- धाराशिव – 300 गावे
- लातूर – 350 गावे

# ससून रुग्णालयातून ललित पाटीलचे पलायन; कामकाजावर प्रश्नचिन्ह?

## ससून रुग्णालयात पुन्हा कैदी रुग्ण समितीची पुनर्रचना

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**ससून सर्वोपचार रुग्णालयातील कैदी रुग्ण समितीचे अध्यक्ष डॉ. सुजित धिवारे यांनी हे पद नको असल्याचे पत्र अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांना दिले आहे. त्यामुळे आता पुन्हा कैदी रुग्ण समितीची पुनर्रचना करावी लागणार आहे. या समितीची पुनर्रचना गेल्या महिन्यातच २६ सप्टेंबरला करण्यात आली होती. त्यामुळे ससून मधील कैदी रुग्ण समितीच्या पुनर्रचनेचा फेरा अजून काही दिवस सुरूच राहणार असल्याची स्थिती आहे.**




आतापर्यंत कैदी रुग्ण समितीच्या अध्यक्षपदी रुग्णालयाच्या अधीक्षकांची नियुक्ती करण्यात येत होती. मात्र चालू वर्षात आतापर्यंत तीन अधीक्षक बदलण्यात आले आहे. समितीच्या अध्यपदाची जबाबदारी अधीक्षकांना न देता उपअधीक्षकांना देण्याचा निर्णय अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांनी २६ सप्टेंबरला घेतला होता. त्यानुसार समितीच्या अध्यक्षपदी डॉ. धिवारे यांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र यानंतर २ ऑक्टोबरला अंमली पदार्थ तस्कर ललित पाटील ससून रुग्णालयातून पळून गेला. यानंतर ललितची रुग्णालयात महिनोंमहिने बडदास्त ठेवण्यासाठी उपचारांचे कागदी घोडे नाचविण्यात आल्याचेही समोर आले आहे. ललित प्रमाणेच इतरही कैद्यांची रुग्णालयात बडदास्त ठेवण्यात येत असल्याचे दिसून असल्याने कैदी समितीच्या कामकाजावर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे या समितीमध्ये काम करण्यास कोणी इच्छुक नसल्याची स्थिती आहे. डॉ. धिवारे यांनी दिलेल्या पत्रावर अद्याप अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांनी निर्णय घेतलेला नाही, असे रुग्णालय प्रशासनाने सांगितले. समितीचे सध्याचे अध्यक्ष डॉ. धिवारे यांच्याकडे उअधीक्षक पदांचा कार्यभार आहे. तसेच त्यांच्याकडे रुग्णालयातील औषध विभागाचीही जबाबदारी आहे. रुग्णालयात उपचारांसाठी दाखल होणारे कैदी मेडिसीन, अस्थिरोग, सर्जरी, श्वसनरोग या विभागांमध्ये दाखल होण्याचे प्रमाण जास्त आहे. सध्याचे अध्यक्ष या विभागांमध्ये कार्यरत नाहीत. परिणामी कैद्याला दाखल आणि डिस्चार्ज देताना अडचणी निर्माण होत आहे. त्यामुळे मेडिसीन, अस्थिरोग, सर्जरी किंवा स्त्रीरोग या विभागामधील वरिष्ठ प्राध्यापकाची समितीच्या अध्यपदी नियुक्ती करण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. कैदी रुग्ण समितीचे अध्यक्षपदी वरिष्ठ प्राध्यापकांकडे सोपवावे, अशी मागणी मी अधिष्ठात्यांकडे केली आहे. वरिष्ठ प्राध्यापक हे तज्ज्ञ असल्याने रुग्ण उपचारांबाबत अधिक योग्य निर्णय घेऊ शकतात. माझ्याकडे उपअधीक्षक पदाचा कार्यभार असल्याने त्या जबाबदाऱ्याही पार पाडाव्या लागतात.

### उपचार केल्याचे केवळ कागदी घोडे

» आतापर्यंत कैदी रुग्ण समितीच्या अध्यक्षपदी रुग्णालयाच्या अधीक्षकांची नियुक्ती करण्यात येत होती. मात्र चालू वर्षात आतापर्यंत तीन अधीक्षक बदलण्यात आले आहे. समितीच्या अध्यपदाची जबाबदारी अधीक्षकांना न देता उपअधीक्षकांना देण्याचा निर्णय अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांनी २६ सप्टेंबरला घेतला होता. त्यानुसार समितीच्या अध्यक्षपदी डॉ. धिवारे यांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र यानंतर २ ऑक्टोबरला अंमली पदार्थ तस्कर ललित पाटील ससून रुग्णालयातून पळून गेला. मला सदस्य म्हणून समितीत स्थान देण्याची मागणी केली आहे, असे कैदी रुग्ण समितीचे अध्यक्ष डॉ. सुजित धिवारे यांनी सांगितले. यानंतर ललितची रुग्णालयात महिनोंमहिने बडदास्त ठेवण्यासाठी उपचारांचे कागदी घोडे नाचविण्यात आल्याचेही समोर आले आहे.

# संतांनी उपदेशाबरोबर प्रश्न विचारण्याचा वारसा जपला

## अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे अविनाश पाटील यांचे वक्तव्य

। पिंपरी ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**"पाश्चात्य विवेकवादी परंपरेपेक्षा भारतीय विवेकवादी परंपरा ही समृद्ध आहे. बुद्ध, चार्वाक, संत आणि सुधारकांची विवेकवादी परंपरा जैविक आहे," असे मत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे अध्यक्ष अविनाश पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी त्यांनी "संतांनी केवळ उपदेश केला नसून प्रश्न विचारण्याचा वारसा जपला," असंही नमूद केलं.**

डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या जन्मदिनानिमित्त महा. अंनिसच्या शिवाजीनगर पुणे शाखेने 'संतविचार, संविधानिक मूल्ये व विवेकवादी परंपरा' या विषयावर एकदिवसीय शिबिर आयोजित केले होते. त्याच्या उद्घाटन सत्रात अविनाश पाटील बोलत होते. अविनाश पाटील म्हणाले, "माणूस हा भावना आणि विचारांचे मिश्रण आहे. भारतीय विवेकवादी परंपरेत भावना आणि विचारांचे प्रतिबिंब आहे.

त्यामुळे ती परंपरा मानवी जगणे उन्नत करण्यासाठी उपयुक्त आहे. पाश्चात्य विवेकवादी परंपरा ही अधिक तर्ककठोर आणि विचारांवर आधारलेली असल्याने ती मनुष्याला बांधून ठेवण्यात कमी पडत आहे. संत सुधारकांचा वारसा कालसुसंगतपणे समजून घेण्याची गरज आहे. तो समाज सुधारणेचा भाग आहे. तो समाज बदलाची प्रक्रिया म्हणून महत्वाचा आहे. संतांनी केवळ उपदेश केला नसून प्रश्न विचारण्याचा वारसा जपला आहे. "संतांनी केलेली मांडणी ही आजच्या एकूणच धर्मांधतेला उत्तर देण्यास प्रभावी आहे, हे सप्रमाण सांगून अत्यंत सडेतोड, तर्कसुसंगत मांडणी धम्मकीर्ती महाराजांनी केली. जागतिक पातळीवर विज्ञान दृष्टिकोन विकसित झालेला नव्हता तेव्हा १२ व्या शतकात भारतात संत परंपरेने भावनेला साद घालत तर्कशुद्ध आणि कार्यकारणभाव असलेली मांडणी केली. त्या काळाच्या अंदाधुंदीला उत्तर दिले. तीच संतांची मांडणी आजच्या काळालाही उत्तर आहे," असे गणेश महाराज फरताळे यांनी सांगितले.





### संवादातुन सामूहिक कृती कार्यक्रम..

» शिबीरातून जो संवाद घडला त्यातून वैयक्तिक व सामूहिक पातळीवर कृतीकार्यक्रम ठरला आहे. मयूर पटारे, शीतल साठे, विनोद लातूरकर, स्नेहल लांडगे, प्रवीण खुंटे, योगेश्वरी भोसले, आकाश छाया, स्वप्नील भोसले, रविराज थोरात, रतन नामपल्ले, प्रिया आमले, प्रतीक पाटील यांचा गायन, परिचय, सुत्रसंचलन, संयोजनात सहभाग होता.

# शिरुरसाठी विलास लांडे 'हुकमी एक्का'!

## दोन्ही राष्ट्रवादीसाठी ठरतील प्रबळ उमेदवार : खासदार अमोल कोल्हे 'स्टार प्रचारक'

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादीत गट पडण्यापूर्वी शिरूर लोकसभेसाठी खा. डॉ. अमोल कोल्हे यांनाच पक्षाने तिकिट दिल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. मात्र निवडणूकीसाठी पाच महिने कालावधी आहे. त्या दरम्यान अनेक घडामोडी घडण्याच्या शक्यता वर्तविण्यात येत आहेत. त्यामुळे ऐनवेळी मैदानात उतरविल्यास गैरसोय नको म्हणून माजी आमदार विलास लांडे देखील अधिक सक्रिय झाल्याचे चित्र होते. शिरूर मधील विविध सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय कार्यक्रमातील लांडे यांची उपस्थिती चर्चेचा विषय ठरत आहे. तर खा. डॉ. अमोल कोल्हे यांची गेल्या पाच वर्षात झालेला नकारात्मकतेची इमेज 'डॅमेज कंट्रोल' करण्याचे आव्हान आहे. त्यामुळे सध्या ते बॅकफुटवरच असल्याचे चित्र आहे. सध्या राष्ट्रवादीत फूट पडली आहे. दोन्ही गटात उमेदवारांचा शोध सुरू आहे. दोघांसाठी माजी आमदार लांडे हुकमी एक्का ठरतील, अशी चर्चा राजकीय जाणकारांमध्ये आहे.**



2019 च्या लोकसभा निवडणूकीनंतर गेल्या पाच वर्षात राष्ट्रवादी पक्षातील पदाधिकाऱ्यांमध्ये विद्यमान खा. कोल्हे यांच्याविषयी नाराजीचा सूर उमटत आहे. पक्षाच्या कार्यक्रमांना अनुपस्थित राहणे, काही ठराविक सांगण्यासारखी कामे सोडली तर इतर महत्त्वाचे प्रकल्प न आणणे, लोकसंपर्काचा अभाव या सर्व गोष्टी नाराजीचे कारण ठरत आहेत. तर दुसरीकडे ते भाजपाशी जवळीक साधत असल्याच्या चर्चाना देखील उधाण आल्याने राष्ट्रवादीने देखील भविष्यातील पाऊले ओळखून सावध पवित्रा घेतल्याचे दिसत होते. ऐनवेळी उमेदवारीची शोधाशोध करण्यापेक्षा पक्षाने इतरांनाही तयारी करण्याच्या सूचना दिल्याचे होत्या. गेल्या निवडणूकीत पक्षाने माघार घ्यायला लावणाऱ्या माजी आमदार विलास लांडे यांनाच पक्षाकडून मैदानात उतरविण्याच्या अंतर्गत हालचाली सुरु केल्या होत्या. लांडे यांनी शिरूर लोकसभेत आपले दौरे वाढविले. भेटीगाठीवर भर दिला. अद्यापही ते काम चालूच आहे. त्यामुळे आगामी उमेदवार तेच असतील असे चित्र राष्ट्रवादीत निर्माण झाले होते. मात्र राष्ट्रवादीच्या पुण्यातील बैठकीत मी लढतो, असे खा. कोल्हे यांनी सांगितल्याने पक्षाने त्यांना तयारीला लागण्याच्या सूचना दिल्या होत्या.

दरम्यानच्या काळात राष्ट्रवादी मध्ये फूट पडली. खा. शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार गटात पक्ष विखुरला गेला. मात्र दोघांकडे सध्या शिरूरसाठी लांडे यांचा पर्याय खुला झाला आहे. खा. कोल्हे यांनी पक्ष फुटीनंतर खा. शरद पवार यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे पवार गटातून कोल्हे मैदानात उतरले तर त्याचा पक्षाला फटका बसेल असे चित्र आहे. खा. कोल्हे यांचा पाच वर्षात जनसंपर्क कमी झाल्याने त्याचा राष्ट्रवादीला फटका बसण्याची शक्यता राजकीय जाणकारांकडून वर्तविण्यात येत आहे. तसेच खा. कोल्हे यांना स्टार प्रचारक म्हणून राज्यभर फिरवले जाऊ शकते. त्यामुळे आगामी लोकसभा कोल्हे लढवतील का, या बाबत साशंकता निर्माण झाली आहे. त्यामुळे खा. पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाकडून आंबेगावचे देवदत्त निकम यांच्या नावावर चर्चा होत आहे. मात्र ते सक्षम उमेदवार ठरतील असे चित्र नाही. या गटाला उमेदवाराचा शोध घ्यावा लागणार ही वस्तुस्थिती आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांना शिरूर लोकसभेअंतर्गत येणाऱ्या पाच राष्ट्रवादीच्या आमदारांनी पाठिंबा दिला असल्याचा दावा त्यांचा गट करत आहे. आमदारांची संख्या पाहता उपमुख्यमंत्री पवार या मतदारसंघावर दावा करतील. त्यांचा वरचष्मा दिसेल अशी परिस्थिती आहे. मात्र मैदानात कोण उतरवायचा या बाबत या गटात खलबते सुरू आहेत. कॅबिनेट मंत्री दिलीप वळसे पाटील यांचे नाव पुढे येत आहे. मात्र ते स्वतः ही निवडणूक लढवायला सकारात्मक दिसत नाही. त्यामुळे अजित पवारांना देखील उमेदवाराचा शोध घ्यावा लागणार आहे.

तर दुसरीकडे विलास लांडे यांनी खेड-आळंदी, जुन्नर, आंबेगाव आदीसह सर्वच मतदारसंघात विविध कार्यक्रमांना उपस्थिती दर्शविण्याचा सपाटा लावला आहे. भेटीगाठींवर भर दिला आहे. मतदारसंघात त्यांचा अभ्यास झाला असून राजकीय मर्यादा देखील त्यांना माहिती आहेत. त्यामुळे दोनही गटासाठी सध्या तरी ते हुकमी एक्का ठरतील असे चित्र आहे. निवडणूकीच्या पाच महिन्याच्या कालावधीत राजकीय घडामोडी बदलतील का, कोणत्या पक्षाची उमेदवारीची माळ विलास लांडे यांच्या गळ्यात पडेल, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

### स्थानिक नागरिकांनी मानले आभार...

» विरोधी पक्षनेते अजित पवारांची लांडे यांना ताकद... माजी आमदार विलास लांडे यांना विरोधी पक्षनेते अजित पवार ताकद देत असल्याचे राजकीय संकेत दिसत आहेत. पिंपरी-चिंचवड शहरातील प्रत्येक दौऱ्यात सध्या माजी आमदार लांडे हे विरोधी पक्षनेते अजित पवारांच्या सोबत दिसत आहेत. लातूरच्या एका दौऱ्यावेळी शहरातून केवळ लांडे यांनाच विमानाने पवार घेऊन गेले होते. तर राष्ट्रवादीत फूट पडण्यापूर्वी पुण्यात झालेल्या पक्षाच्या आढावा बैठकीत विविध राजकीय रंग समोर आले होते. त्यामध्ये खा. डॉ. अमोल कोल्हेंना निवडणूक लढणार की नाही हे स्पष्ट सांगा असे खडसावून विचारत माझा कार्यकर्ता विलासला किती वेळा शांत बसवायचा, असे वक्तव्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केल्याचे पदाधिकारी सांगत आहेत. तर माध्यमांशी बोलताना विलास लांडे यांनी काही गणिते केली असतील त्यामुळे ते लोकसभेच्या तयारीला लागले असतील अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री पवारांनी दिली होती. त्यामुळे अजित पवार यांनी सध्या लांडे यांच्याबाबत सॉफ्ट कॉर्नर घेतला असल्याची चर्चा आहे.

### खा. शरद पवार गटातून लढणे होईल सोपे...

**» राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या फुटीनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विरोधात सर्वसामान्य जनतेत नाराजीचा सूर असल्याचे स्पष्ट होते. खासदार शरद पवार यांच्याबाबत तसेच महाविकास आघाडीत सहभागी पक्ष शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या विषयी जनतेत भावनिक लाट निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यांचे पारडे जड असेल. तर शिरूर लोकसभाअंर्तगत येणाऱ्या पाच राष्ट्रवादीच्या आमदारांमध्ये शिरूरचे आमदार अशोक पवार हे खा. शरद पवार यांच्या कार्यक्रमात सातत्याने दिसून येत आहेत. जुन्नरचे आमदार अतुल बेनके आणि हडपसरचे आमदार चेतन तुपे यांनी तटस्थ भूमिका घेतली आहे. यासह शिरूर लोकसभेमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यापेक्षा खासदार शरद पवार यांचा शब्द प्रमाण मानणाऱ्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे खासदार शरद पवार गटातून माजी आमदार विलास लांडे लोकसभेचे उमेदवार म्हणून उभे राहिले त्यांच्यासाठी ते फायद्याचे ठरेल ते राजकीय जाणकार सांगत आहे.**

---

# चिखलीतील उभारणार सुसज्ज गोशाळा!

## आ. महेश लांडगे यांचा आग्रही पुढाकार : आयुक्त शेखर सिंह यांच्या बैठकीत सकारात्मक चर्चा

। पिंपरी ।महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून चिखली येथील सुमारे ५ एकर जागेत गो संवर्धन केंद्र आणि गोशाळा सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी सकारात्मक भूमिका घेतली असून, लवकरच कार्यवाही करण्यात येणार आहे.**



भोसरी विधानसभा मतदार संघातील विविध विकासकामांबाबत महापालिका भवनात आमदार महेश लांडगे यांनी बैठक घेतली. यावेळी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त- १ प्रदीप जांभळे-पाटील, अतिरिक्त आयुक्त- २ विजय खोराटे, मुख्य शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता श्रीकांत सवणे, पर्यावरण विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

राज्यात २०१४ मध्ये भाजप-शिवसेनेचे सरकारच्या काळात गोवंश हत्याबंदी कायद्याला मंजुरी मिळाली आहे. आता राज्यातील गो-संवर्धनासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी पुढाकार घेतला पाहिजे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने गोशाळा – गो संवर्धन केंद्र सुरू करावे. त्यासाठी पुरेशी जागा आणि पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली होती. आमदार लांडगे म्हणाले की, शहराचा विस्तार वाढत असल्यामुळे रस्त्यावर फिरणाऱ्या गायी, बैल आदी गोवंशाची संख्याही जास्त आहे. अनेकदा दूध न देणाऱ्या गायी अर्थात भाकड गायी शेतकऱ्यांकडून सोडून दिल्या जातात. असे गोवंश शहरातील रस्त्यांवर पहायला मिळतात. जखमी किंवा आजारी असल्यामुळे गोवंशाला उपाचाराची आवश्यकता असते. अनेकदा उपचाराअभावी गायींचा मृत्यूही झाल्याची उदाहरणे आहेत.

> प्रस्तावित गोशाळेसाठी चिखली येथील ५ एकर जागा उपलब्ध करण्याबाबत प्रशासन सकारात्मक आहे. त्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. या जागेकरिता १८ मीटर रस्ता नियोजित आहे. त्याचे भूसंपादन आणि तांत्रिक कार्यवाही करण्याबाबत प्रशासनाला सूचना केली आहे. गोवंश हा आपली संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे. त्यामुळे गोसंवर्धनासाठी आम्ही पुढाकार घेतला आहे.
>
> **-महेश लांडगे,**
> **आमदार, भोसरी विधानसभा. भाजपा, पिंपरी-चिंचवड.**



## भूमिका

**शहर विकास' या गोंडस नावाने गेल्या काही दशकांपासून आपल्या शहरांमध्ये प्रचंड विध्वंस होत आहे. रात्रंदिवस जेसीबीने तोडफोड, राडारोडा, बांधकाम साहित्याची ट्रक-ट्रॅक्टरद्वारे वाहतूक, लोखंडी सळ्यांची कापणी, सेंटरिंगची ठोकाठोक, बांधकाम स्थळीच वेल्डिंग, फरश्यांचे कटिंग हे सर्व बिनधास्त, बेबंद, आडदांड, अरेरावी पद्धतीने राजरोस चाललेले आहे.**

# शहरं बेबंद, उद्ध्वस्त होत आहेत



याला धूळ, ध्वनी प्रदूषणाच्या धोक्याशी कोणतेही देणेघेणे नाही! थोडक्यात, भूखंडाचे मालक, दलाल, कंत्राटदार, अधिकारपत्रधारक, विकासक, बिल्डर, या समस्त धनदांडग्या प्रभावळीचे व त्यांचे पाठीराखे लोकप्रतिनिधी-पदाधिकारी-अधिकारी यांचे संगनमत व अभद्रयुतीमुळे हा धूमधडाका राजरोस वर्षानुवर्षे चालला आहे... या अनियंत्रित बांधकामांचा मोठा हात मुंबईचे हवा-प्रदूषण वाढवण्यात आहे, याची कबुली अखेर गेल्या आठवड्यात मिळाली! मुंबईच्या बांधकाम प्रदूषणाने घातलेल्या थैमानाबाबत जी ठळक बातमी वृत्तपत्रांत झळकली ती डोळ्यात अंजन घालणारी आहे. मुंबई महापालिकेचे प्रशासक इकबालसिंग चहल यांनी मुंबईत सहा हजार बांधकामांना नियम पाळण्याची तंबी दिली. बांधकाम करताना धूलिकण इतस्तत: पसरू नये यासाठी उंच पत्रे लावणे, पाणी फवारणे यांसह अनेक निर्बंध पाळण्यास सांगितले आहे. यापूर्वी गेल्या वर्षी दिल्लीत सर्व बांधकामे स्थगित ठेवण्यात आली होती. या हवा-प्रदूषणाच्या परिणामी शहर बकाल, बेबंद, कायम आजारग्रस्त असते, धूलिकणांचे हवेतील प्रमाण धोका पातळीच्या कैकपट अधिक असून यामुळे श्वसनाचे आजार ही घरोघरची त्रासदी आहे. ध्वनिप्रदूषणामुळे बालके, वृद्धच काय कोणताही माणूस नीट झोपू शकत नाही. निद्रानाशाचे आजार ही सामान्य बाब बनली आहे. ऊन, प्रकाश, हवेसाठी घराला दारे-खिडक्या असतात पण त्या कायम बंद ठेवाव्या लागतात! श्रीमंत लोक करतात वातानुकूलिततेची, हवा शुद्धीकरण सयंत्राची सोय!!सर्वसामान्य नागरिकांना काय तर दुर्गंधी, डास व सर्व तऱ्हेच्या प्रदूषणाची मनपा भेट! थोड्याथोडक्या नव्हे तर किमान ८० टक्के लोकसंख्येला या नरकपुरीत जगावे लागते. तब्बल निम्मेअधिक 'शहरवासीय' झोपडपट्ट्या, बकालवस्त्या व नळ पाण्याच्या अभावग्रस्तेत एक दोन खोल्यात राहण्यास मजबूर आहेत.

प्रश्न आहे की हा सर्व शहर विकास-विस्ताराचा खटाटोप, त्यासाठी अब्जावधींची तरतूद, राज्य व केंद्राचे अर्थसाह्य, कर्ज कशासाठी? तर म्हणे 'स्मार्टसिटी बनविण्यासाठी'! होय, शहर स्वच्छ, आरोग्यदायी, मानवी, राहण्यालायक (लिव्हेबल) असणे गरजेचे आहे. संविधानाने व अन्य कायद्यांनी प्रत्येक नागरिकाला स्वच्छ हवापाणी, विषमुक्त अन्न, गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा, दर्जेदार शिक्षण, योग्यनिवारा, ऊर्जा व वाहतूक सेवासुविधांचा हक्क प्रदान केला आहे. मात्र, स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर ७० टक्के नागरिक यापासून वंचित आहेत. यासाठी केंद्राच्या, राज्याच्या आणि स्थानिक स्वराज्य संस्थाच्या अर्थसंकल्पात मुबलक तरतूदी तसेच सेवासुविधा पुरवणाऱ्या यंत्रणाचा मोठा लवाजमा आहे. तथापि ते जबाबदेही मानत नाही. आता तर महाराष्ट्रासह राज्यांनी यासाठी 'सेवाहमी कायदा' केला; तरी पण. कैफियत एका शहराची! प्रस्तुत लेखक गेली ६५ वर्षे औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) शहरात वास्तव्यास आहेत. जुन्या व नव्या शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी राहिले; किमान दहा भाड्याच्या घरात. अनुभव हा आहे की भुखंडाच्या किमती भरमसाठ वाढल्यामुळे कोणत्याही वस्तीत चांगली राहण्यायोग्य घरे पाडून बहुमजली फ्लॉट, कुठेही दुकाने, व्यापारी संकुले बांधली जातात. पर्यावरणाच्या दृष्टीने हे हानीकारक आहेच. सोबतच धूळ व अन्य प्रदूषणामुळे मानवी आरोग्यास घातक आहे. मुळातच जी घरे व वास्तू राहण्या-वापरण्या योग्य आहे त्या पाडण्यास कुठल्याही सबयीखाली परवानगी देण्यात येऊ नये. बांधकाम साहित्य व श्रमाचा हा अपव्यय आहे. मात्र, प्रत्येक शहरात हे हमखास घडत असून यात नगरनियोजन शहर आराखड्याचे सर्व नियम धाब्यावर बसवले जातात! बांधकाम क्षेत्र हा भ्रष्टाचाराचा अड्डा असल्यामुळे प्रत्येक वास्तू व रचना ही नियम उल्लंघन करणारी असते.

## संपादकीय »

# प्रश्न बेरोजगारांचा

***अझीम प्रेमजी विद्यापीठाच्या 'स्टेट ऑफ वर्किंग इंडिया-2023' या ताज्या अहवालात केलेल्या दाव्यानुसार भारतात आजघडीला 15 टक्क्यांहून अधिक पदवीधर बेरोजगार असल्याचे वास्तव समोर आले आहे.***

25 वर्षांहून कमी वयाच्या पदवीधरांमध्ये बेरोजगारीचा दर 42 टक्के असल्याचे हा अहवाल दर्शवतो. 2019 नंतर भारतात नियमित वेतन मिळणाऱ्या नोकऱ्यांची उपलब्धता वेगाने कमी झाल्याचे चित्रही यामधून समोर आले आहेकोणत्याही सरकारच्या धोरणांमध्ये रोजगारनिर्मिती हा अग्रबिंदूही असतो आणि या धोरणांचे उद्दिष्टही जास्तीत जास्त लोकांच्या हाताला काम मिळवून देणे हेच असते. कारण, गरिबी, उपासमारी, शिक्षण, आरोग्य याबरोबरच अर्थव्यवस्थेला प्रगतिपथावर नेणारी वस्तू व सेवांची मागणी या सर्व बाबी रोजगाराशी जोडलेल्या आहेत. औद्योगिक विकासाची चाकेही रोजगारावर अवलंबून आहेत. तथापि, गेल्या काही वर्षांत जगभरामध्ये बेरोजगारीचा मुद्दा प्रकर्षाने पुढे येऊ लागला आहे आणि त्यामुळेच अन्य अनेक प्रश्न बिकट बनत चालले आहेत.

**नांदेड येथील शंकरराव चव्हाण शासकीय वैद्याकीय महाविद्यालय (जीएमसी) रुग्णालयात १ ऑक्टोबर २०२३ या तारखेला २४ तासांच्या कालावधीत २४ मृत्यू झाले. नांदेड येथील शासकीय रुग्णालयात २४ जणांचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर जन आरोग्य अभियानाच्या वतीने एक सत्यशोधन समिती तिथे पाठवण्यात आली होती. या समितीने नुकताच तिचा अहवाल सादर केला आहे.**

# नांदेड रुग्णालयातील मृत्यू; हिमनगाचे टोकच फक्त!

नांदेड येथील शंकरराव चव्हाण शासकीय वैद्याकीय महाविद्यालय (जीएमसी) रुग्णालयात १ ऑक्टोबर २०२३ या तारखेला २४ तासांच्या कालावधीत २४ मृत्यू झाले. इतक्या मोठ्या प्रमाणात मृत्यू झाल्याने वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रे व सर्व डिजिटल माध्यमांनी या घटनेचे सविस्तर वृत्तांकन केले. राज्यातील विरोधी पक्षांचे प्रमुख नेते, आरोग्य चळवळीतील कार्यकर्ते, सामान्य नागरिक अशा सर्व थरांतून यावर प्रतिक्रिया उमटल्या.

नांदेडच्या घटनेनंतर जन आरोग्य अभियानाच्या वतीने एक सत्यशोधन समिती नांदेडला पाठवण्यात आली. या समितीमध्ये सार्वजनिक आरोग्यतज्ज्ञ, डॉक्टर, आरोग्य हक्क कार्यकर्ते व स्थानिक सामाजिक कार्यकर्ते यांचा समावेश होता. जन आरोग्य अभियान गेल्या २२ वर्षांपासून सार्वजनिक आरोग्य चळवळीत कार्यरत आहे. सरकारी आरोग्य सेवांची यंत्रणा



सक्षम झाली पाहिजे, आरोग्याच्या तरतुदीमध्ये भरीव वाढ झाली पाहिजे हा मुद्दा जन आरोग्य अभियानाने सातत्याने उचलला आहे. त्यामुळे अभियानाकडून नांदेडला पाठवण्यात आलेल्या सत्यशोधन समितीने अत्यंत गांभीर्याने या घटनेची सर्व अंगांनी पाहणी, अभ्यास व तपास केला. याबाबतचा सविस्तर अहवाल नुकताच समितीने प्रकाशित केला आहे.

रुग्णालयाचे प्रशासक, वरिष्ठ आणि कनिष्ठ सरकारी डॉक्टर, परिचारिका, खासगी डॉक्टर आणि स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांकडून सदस्यांनी माहिती गोळा केली. त्याचबरोबर नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील सार्वजनिक आरोग्य सेवांबाबतही माहिती घेण्यात आली. समितीच्या असे निदर्शनास आले की, नांदेड वैद्याकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयावर वाढत्या रुग्णसंख्येमुळे कामाचा मोठा ताण पडत आहे. जिल्हा व तालुकास्तरावर सार्वजनिक क्षेत्रात तज्ज्ञ उपचार सुविधांची (स्पेशालिस्ट केअर) कमतरता असल्याचा तो स्पष्ट परिणाम आहे. जीएमसी नोंदलेल्या २४ मृत्यूंपैकी ११ नवजात बालकांचे होते. त्यामुळे निओनेटल इंटेन्सिव्ह केअर युनिटची (एनआयसीयू) पाहणी पहिल्यांदा करण्यात आली. या युनिटसाठी पाच पाळण्यांची मंजुरी आहे, प्रत्यक्षात वापरात असलेल्या पाळण्यांची संख्या २० आहे, परंतु बालरुग्णांचा ओघ प्रचंड असल्यामुळे अनेकदा ६० पेक्षा जास्त नवजात बालकांना दाखल करून घेतले जाते. म्हणून दोन ते तीन बाळांना एका पाळण्यात ठेवण्याची वेळ येते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मराठ्यांना तातडीने प्रमाणपत्र!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची महत्त्वाची घोषणा

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन राज्यभरात पेटलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महत्त्वाची घोषणा केली. कुणबी नोंदी असलेल्या मराठ्यांना तातडीने दाखले दिले जातील. मराठा आरक्षण मिळवण्यासाठी नव्याने प्रयत्न केले जातील, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.**

सह्याद्री अतिथीगृहावर मराठा आरक्षण उपसमितीची बैठक बोलावण्यात आली होती. या समितीनं आत्तापर्यंत केलेल्या कामाचा अहवाल सादर केला. यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेऊन बैठकीतील तपशील सर्वांसमोर मांडला. मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भात आणि मनोज जरांगे पाटील यांचं उपोषण आणि राज्याच्या विविध भागात आंदोलनं सुरु आहेत. या पार्श्वभूमीवर अतिश्य महत्त्वाची मराठा आरक्षण उपसमितीची बैठक मी सहभागी झालो होतो. या बैठकीमध्ये अतिश्य तपशीलवार चर्चा झाली. हा अहवाल आम्ही उद्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडून स्वीकारून पुढील प्रक्रिया करु. न्यायमूर्ती शिंदे समितीने १ कोटी ७२ लाख कागदपत्रांची तपासणी केली.

त्यामध्ये ११५३० कुणबी नोंदी आढळून आल्या. त्यांनी संपूर्ण सविस्तर अहवाल सादर केला. फार जुने जुने रेकॉर्ड तपासले, उर्दू आणि मोडी लिपीतील रेकॉर्ड तपासले, हैद्राबाद येथील जुने, पुरावे, नोंदी यासाठी विनंती केली आहे. त्याच्यामध्येही आणखी काही कुणबी नोंदी सापडण्याची शक्यता, त्यासाठी दोन महिन्यांचा अवधी लागेल. शिंदे समितीने अनेक पुरावे तपासले, चांगलं आणि तपशीलवार काम केले आहे.त्यामुळे सरकारने त्यांना



दोन महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. तरीही आम्ही त्यांना सांगितलं आहे, अंतिम अहवाल लवकरात लवकर सादर करा. कुणबी प्रमाणपत्र नोंदी सापडल्यात त्याची तपासणी करुन पुढची कार्यवाही केली जाईल', असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

तसेच मूळ मराठा आरक्षण सुप्रीम कोर्टात रद्द झालं आहे, त्यावर सरकार काम करत आहे. क्युरेटिव्ह पेटिशन ऐकण्यास सर्वोच्च न्यायालयाने मान्यता दिली आहे. त्याबाबत राज्य सरकारचे काम युद्धपातळीवर सुरु असल्याचेही एकनाथ शिंदे यांनी सांगितले. खरं म्हणजे हा मुद्दा फार जुना आहे, मराठा आरक्षणाचा. तरी या मुद्द्याला देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना मिळाली, त्यावेळी मराठा समाजाला आरक्षण मिळालं. ते आरक्षण उच्च न्यायालयात टिकलं. सुप्रीम कोर्टात हे आरक्षण दुर्दैवाने रद्द झाले. त्यावेळेस सुप्रीम कोर्टाने आरक्षणात काही त्रुटी काढल्या. त्यावेळी सरकारला मराठा आरक्षणाची बाजू पटवून देता आली नाही. अनेक कागदपत्रं सादर करण्यात विलंब झाला.

पण आता मराठा समाज मागास कसा आहे, हे सिद्ध करण्यासाठी आमचे युद्धपातळीवर प्रयत्न सुरु आहेत. त्याचबरोबर उद्या मराठा आरक्षण उपसमिती आणि सरकारी अधिकारी मनोज जरांगे पाटील यांचे काही प्रतिनिधींशी चर्चा करतील, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. गेल्यावेळी मराठा आरक्षणासाठी ५८ मोर्चे निघाले,हे मोर्चे शिस्तबद्ध पद्धतीने निघाले, आंदोलनाला गालबोट लागले नाही. राज्यातील कायदा-सुव्यवस्था धोक्यात आली नाही. पण दुर्दैवाने आज काही ठिकाणी कायदा-सुव्यवस्था हातात घेत जाळपोळ केली जात आहे.

मराठा समाजाने या सगळ्याकडे सजगपणे पाहिले पाहिजे. मराठा बांधवांना विनंती आहे की, आत्महत्येसारखं टोकाचं पाऊल आपण उचलू नका, आपल्या मुलाबाळांचं , आई-वडिलांचा विचार करा. आम्ही मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी कुणबी प्रमाणपत्र देण्यासंदर्भात आणि सर्वोच्च न्यायालयातील क्युरेटिव्ह पेटिशन अशा दोन टप्प्यात आम्ही काम करत आहोत. मराठा समाजाला कायद्याच्या चौकटीत टिकणारं, इतर कोणत्याही समाजावर अन्याय न करता आम्ही आरक्षण देणार आहोत. मनोज जरांगे पाटील यांना विनंती आहे की, तुम्ही सरकारला थोडा वेळ दिला पाहिजे.

### सरकारला जरांगे यांची चिंता

» मनोज जरांगे पाटील यांनी स्वत:ची काळजी घेतली पाहिजे, वैद्यकीय उपचार घेतले पाहिजेत, पाणी प्यायले पाहिजे. सरकारला मनोज जरांगे यांची चिंता आहे. त्यांचा लढा सरकारने गांभीर्याने घेतला आहे. त्यामुळे आम्ही आज महत्त्वाची बैठक बोलावली होती. त्या बैठकीत आपण दोन मार्गाने मराठा समाजाला न्याय देण्याचा निर्णय घेतला आहे. पण आपण झटकन हा निर्णय घ्या, घेऊ नका, असं आपण करु शकत नाही. जो निर्णय सरकार घेईल तो टिकाऊ, कायद्याच्या चौकटीत आणि कायमस्वरुपी असला पाहिजे, ही आमची भूमिका आहे. आज बैठकीमध्ये असाही निर्णय झाला, की शिंदे समितीचा अहवाल कॅबिनेटमध्ये स्वीकारल्यानंतर जुन्या कुणबी नोंदी असलेल्यांना त्यांची कागदपत्रं तपासून त्यांना तातडीने प्रमाणपत्र दिली जातील, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

# मराठ्यांसाठी स्वत:चा जीव सांभाळा!

## अ‍ॅड. आंबेडकरांचा जरांगे-पाटलांना पाठिंबा

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा बेमुदत उपोषणाला बसले. आज (३० ऑक्टोबर) उपोषणाच्या सहाव्या दिवशी जरांगेंची तब्येत खालावली. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर यांनी मनोज जरांगेंना पत्र लिहिले आहे. यात त्यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी बेमुदत उपोषणाला बसलेल्या जरांगे यांच्या आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला. तसेच त्यांनी स्वतःची काळजी घ्यावी असं आवाहनही केलं.**





प्रकाश आंबेडकर म्हणाले, “गरीब आणि रयतेच्या मराठ्यांच्या आरक्षणासाठी तुम्ही पुढाकार घेऊन मोठं आंदोलन उभं केलं आणि प्रस्थापित निजामी मराठा नेतृत्वाच्या विरोधात समाजात जागृती निर्माण केली. २०१४ नंतर मनुस्मृती मानणाऱ्या व्यवस्थेची गढी दुर्दैवाने देशात आणि राज्यात सत्तेत आली आहे. या सत्तेच्या विरोधात कुणी आवाज बुलंद केला, तर त्यांचे मानसिक, सामाजिक, राजकीय खच्चीकरण करून जाती जातीत भांडणं लावून देण्यात येतात. हे थांबवणे गरजेचे आहे. “आपण प्रामाणिकपणे छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी या शोषणा विरुद्ध लढा उभा करीत आहात आणि त्यासाठी तुमचे आरोग्य उत्तम असणे गरजेचे आहे. समाजात लोकांच्या प्रश्नावर आंदोलन करणारेच राहिले नाहीत, तर त्यांची बाजू कोण घेणार? गरीब, रयतेच्या मराठ्यांना आपला फार मोठा आधार वाटत आहे. त्यामुळे आपण स्वतःचा जीव सांभाळावा असे मी आपणास आवाहन करतो,” असं मत आंबेडकरांनी व्यक्त केलं. “मराठा आरक्षणाची मागणी करणारे गरीब मराठे आणि ही मागणी पूर्ण करू शकणारे सत्ताधारी निजामी मराठे असे दोन्ही बाजूने मराठे असूनही गरीब मराठ्यांची मागणी पूर्ण होत नाही. सत्ता काँग्रेसची असो, भाजपाची असो किंवा राष्ट्रवादीची असो, यांनी गरीब मराठ्यांच्या प्रश्नाला कधीच महत्त्व दिले नाही.

# सर्वोच्च न्यायालयातील संघर्ष टोकाला जाईल?

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

मुख्यमंत्री शिंदे यांच्यासह शिवसेनेच्या १६ आमदारांच्या अपात्रेबाबत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणाच्या सुनावणीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयानं कठोर पाऊल उचललं आहे. १६ आमदारांच्या अपात्रतेबाबत ३१ डिसेंबरपर्यंत निर्णय घ्या, असे निर्देश सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी दिले. तर, राष्ट्रवादी काँग्रेसमधील आमदारांच्या अपात्रेतचा निर्णय ३१ जानेवारीपर्यंत द्यावा, असेही सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं. यावर ज्येष्ठ वकील उज्वल निकम यांनी भाष्य केलं आहे. ही संघर्षांची नांदी तर नाही? अशी शंका उज्वल निकम यांनी व्यक्त केली आहे. ते प्रसारमाध्यमांशी संवाद साधत होते. उज्वल निकम म्हणाले, “सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीनंतर घटनात्मक पेच निर्माण होण्याची शक्यता आहे. ३१ डिसेंबरपर्यंत सुनावणी पूर्ण करू, असं अध्यक्षांनी सर्वोच्च न्यायालयात अभिवचन दिलं नाही. ३१ डिसेंबरपर्यंत सुनावणी पूर्ण झाली नाही तर काय होईल? दहाव्या परिशिष्टानुसार आमदार अपात्रतेचा निर्णय घेण्याचा अधिकार विधानसभा अध्यक्षांना देण्यात आला आहे. “अध्यक्षांनी किती वेळेत सुनावणी पूर्ण केली पाहिजे, याची कुठेही स्पष्टता नाही. याआधी सर्वोच्च न्यायालयानं अनेक खटल्यांना तीन आणि एक महिन्यांची मुदत दिली होती.

# ममता बॅनर्जींना झटका!

## » टाटाला द्यावी लागणार 766 कोटींची भरपाई

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**टाटा मोटर्सला मोठा दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. पश्चिम बंगालमधील सिंगूर येथील टाटा नॅनो कारसाठी लावण्यात आलेला प्लांट बंद झाल्यानंतर झालेल्या नुकसानभरपाई पोटी व्याजासह 766 कोटी रुपये मिळणार आहेत. तीन सदस्यीय मध्यस्थ न्यायाधिकरण यानी आरबीट्रल ट्रिब्यूनलने टाटा मोटर्सच्या बाजूने हा निकाल सुनावला आहे. ज्या प्रकल्पासाठी विरोध केला, ज्या प्रकल्पाने ममता बॅनर्जी यांना मुख्यमंत्रिपदावर विराजमान केले, त्याच प्रकल्पाची नुकसानभरपाई म्हणून आता ममता यांच्या सरकारला टाटांना नुकसानभरपाई द्यावी लागणार आहे.**

टाटा मोटर्सने नियामक फाइलिंगमध्ये म्हटले आहे की टाटा मोटर्स लिमिटेड आणि पश्चिम बंगाल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड (डब्ल्यूबीआयडीसी) यांच्यात सिंगूरमधील ऑटोमोबाईल उत्पादन प्रकल्पात केलेल्या गुंतवणुकीवरील भांडवली नुकसानासाठी टाटा मोटर्सने डब्ल्यूबीआयडीसीकडून भरपाईसाठी दावा केला होता. या प्रकरणावर लवाद प्राधिकरणाकडे सुनावणी सुरू होती. तीन सदस्यीय लवाद न्यायाधिकरणाने 30 ऑक्टोबर 2023 रोजी एकमताने टाटा मोटर्स लिमिटेडच्या बाजूने निर्णय दिला आहे.न्यायाधिकरणाने आपल्या आदेशात म्हटले आहे की टाटा मोटर्स 1 सप्टेंबर 2016 पासून वार्षिक 11 टक्के व्याजासह पश्चिम बंगाल विकास निगम लिमिटेडकडून 765.78 कोटी रुपये वसूल करू शकतात. टाटा मोटर्सने सांगितले की, न्यायाधिकरणाने या सुनावणीवर झालेला एक कोटी रुपयांचा खर्चही वसूल करण्याचे आदेश दिले आहेत. लवाद न्यायाधिकरणाच्या या निर्णयामुळे लवादाबाबत सुरू



असलेली सुनावणी आता संपली आहे. पश्चिम बंगालच्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वातील डाव्या आघाडीच्या सरकारने नॅनो कार बनवण्यासाठी सिंगूरमधील 1000 एकर जमीन टाटा मोटर्सला दिली होती. या ठिकाणी टाटा मोटर्सने कार बनवण्यासाठी प्लांटमध्येही गुंतवणूक केली होती. परंतु राज्याच्या विद्यमान मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि तत्कालीन विरोधी पक्षाच्या नेत्या ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वात तृणमूल काँग्रेस, काँग्रेस, भाजपने कारखान्यासाठी जमीन देण्यास विरोध दर्शवला. या मुद्यावरून मोठा संघर्ष उफाळून आला होता. या विरोधानंतर टाटा मोटर्सने नॅनो कार प्लांट उभारण्याचा निर्णय रद्द केला. टाटा मोटर्सने नंतर गुजरातमधील साणंद येथे नॅनो कार प्लांट उभारला होता. मात्र, आता कंपनीने नॅनो कारचे उत्पादन बंद केले आहे.

पश्चिम बंगालचे तत्कालीन मुख्यमंत्री बुद्धदेव भट्टाचार्य यांनी कारखाना उभारणीसाठी जोरदार प्रयत्न केले होते. या कारखान्याच्या माध्यमातून पश्चिम बंगालमध्ये आणखी कारखाने येतील आणि औद्योगिकीकरणाला चालना मिळेल असा विश्वास त्यांना होता. त्यामुळे राज्यातील युवकांना रोजगार उपलब्ध होईल, असा विश्वासही त्यांच्या सरकारने व्यक्त केला होता. मात्र, ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वात झालेल्या आंदोलनाने आधी सिंगूर आणि त्यानंतर नंदीग्राम येथील प्रकल्प गुंडाळले गेले. या विरोधाच्या संघर्षाने डाव्यांची बंगालमधील सलग 34 वर्षांची सत्ता संपुष्टात आली. राष्ट्रगीताचा अवमान केल्याच्या आरोपाप्रकरणी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याविरोधात दाखल केलेली तक्रार माझगाव येथील न्यायदंडाधिकाऱ्यांनी सोमवारी फेटाळली. याप्रकरणी कोणताही गुन्हा घडलेला नाही, असे निरीक्षण नोंदवून न्यायालयाने ममता यांना दिलासा दिला आहे. माझगाव येथील न्यायदंडाधिकारी एस. बी. काळे मोकाशी यांनी सोमवारी याप्रकरणी निर्णय देताना ममता यांच्याविरोधात भाजप पदाधिकारी विवेकानंद गुप्ता यांनी केलेली तक्रार फेटाळली. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या डिसेंबर २०२१ मध्ये मुंबई दौऱ्यावर आल्या होत्या. त्या वेळी नरिमन पॉइंट येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडलेल्या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली होती.

### न्यायालयाचा आदेश चुकीचा

» ममता बॅनर्जी यांनी विशेष न्यायालयात धाव घेतली होती. विशेष न्यायालयाने ममता यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई सुरू करण्याचा आणि समन्स बजावण्याचा शिवडी महानगर दंडाधिकाऱ्यांचा आदेश रद्द केला होता. त्याच वेळी बॅनर्जी यांच्याविरोधात केलेल्या तक्रारीवर नव्याने विचार करण्याचे आदेश दिले होते. या आदेशाविरोधात ममता यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. विशेष न्यायालयाचा आदेश चुकीचा असल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे या निर्णयात हस्तक्षेप करणार नाही, असे स्पष्ट करू उच्च न्यायालयाने ममता यांची याचिका फेटाळली होती.

# देणग्यांची माहिती मिळवण्याचा अधिकार नाही

## » हा नागरिकांचा मूलभूत अधिकार नाही : मोदी सरकार

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राजकीय पक्षांना देणग्या देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या इलेक्टोरल बॉण्ड्स सिस्टमला (ELECTORAL BONDS ISSUE) आव्हान देण्याच्या सुनावणीपूर्वी ॲटर्नी जनरल आर वेंकटरामानी यांनी सर्वोच्च न्यायालयात उत्तर दाखल केलं आहे. कोणत्याही राजकीय पक्षाला मिळालेल्या देणग्यांची माहिती मिळणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार नाही, असे केंद्र सरकारचे ज्येष्ठ वकिलांनी म्हटले आहे.**

इलेक्टोरल बॉंड्सच्या माध्यमातून दिलेल्या देणग्यांची माहिती लोकांना मिळू शकत नाही, असे सांगून ती प्रणाली नाकारता येणार नाही, असाही दावा केला. सरन्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील 5 न्यायमूर्तींच्या घटनापीठासमोर उद्या मंगळवार 31 ऑक्टोबरपासून या प्रकरणात सुनावणी सुरू होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने ॲटर्नी जनरल यांना या प्रकरणी आपले मत मांडण्यास सांगितले होते. ॲटर्नी जनरल म्हणाले की, "राजकीय पक्षांना देणग्या देण्यासाठी ही व्यवस्था धोरणात्मक बाब आहे. सर्वोच्च न्यायालय कोणत्याही कायद्यात तेव्हाच हस्तक्षेप करते



जेव्हा ते नागरिकांच्या मूलभूत किंवा कायदेशीर अधिकारांचे उल्लंघन करत असते. या प्रकरणात असे म्हणता येणार नाही. याउलट संघटना बनवणे आणि चालवणे हा घटनेच्या कलम 19 (1) (सी) अन्वये मूलभूत अधिकार आहे, ज्या अंतर्गत राजकीय पक्षांनाही अधिकार आहेत.वेंकटरामानी यांनी म्हटले आहे की, निवडणूक प्रतिज्ञापत्राद्वारे उमेदवार मतदारांना त्याच्या गुन्हेगारी रेकॉर्डची माहिती देतो. 'पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टी विरुद्ध भारत सरकार' या 2003 च्या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने हा आदेश दिला होता. परंतु सध्या लोकांना राजकीय देणग्यांबाबत माहिती घेण्याचा अधिकार नाही. जरी न्यायालयाने हक्काची नव्याने व्याख्या केली तरी, कोणताही विद्यमान कायदा त्याच्या आधारावर थेट रद्द केला जाऊ शकत नाही. यापूर्वी निवडणूक आयोगानेही या प्रकरणी आपले मत दिले होते. इलेक्टोरल बॉंड पद्धतीत पारदर्शकता नसल्याचे निवडणूक आयोगाने म्हटले होते. यातून काळ्या पैशाला चालना मिळण्याची शक्यता आहे. परदेशी कंपन्यांकडून देणग्या घेण्यास सूट दिल्याने सरकारी धोरणांवर विदेशी कंपन्यांचा प्रभाव पडण्याची शक्यता आहे. मात्र, निवडणूक रोख्यांमुळे राजकीय देणग्या प्रक्रियेत पारदर्शकता आल्याचा दावा सरकारने केला आहे.

### इलेक्टोरल बॉंड म्हणजे काय?

» केंद्र सरकारने राजकीय देणग्यांची प्रक्रिया अधिक स्वच्छ करण्याच्या नावाखाली इलेक्टोरल बॉंड कायदा लागू केला. या अंतर्गत, प्रत्येक तिमाहीच्या पहिल्या 10 दिवसांत स्टेट बँकेच्या निवडक शाखांमधून रोखे खरेदी करून ते राजकीय पक्षाला दान करण्याची तरतूद आहे. त्यामुळे रोख स्वरूपात मिळणाऱ्या देणग्या कमी होतील, असे सांगण्यात आले. रोखे खरेदी करणाऱ्या ग्राहकाची संपूर्ण माहिती बँकेकडे असेल.

# रितेश देशमुखचा जरांगेंच्या उपोषणाला पाठिंबा!

सध्या मराठा आरक्षणाचा विषय ऐरणीवर आहे. आज ठिकठिकाणी मराठा आरक्षणासाठी आंदोलकांनी आंदोलन केलंय. अनेक जण या आंदोलनासाठी मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा देत आहेत. अशातच हिंदी - मराठी इंडस्ट्री गाजवलेला रितेश देशमुखने मराठा आरक्षणासाठी उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्याविषयी काळजी करुन X वर केलेलं ट्विट चर्चेत आहे. रितेश देशमुखने X वर मनोज जरांगे पाटील आणि मराठा आरक्षण आंदोलनाचा फोटो शेअर केलाय. त्यावर रितेश लिहितो, "जय शिवराय, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मराठा समाजातल्या मागास घटकांच्या न्याय्य मागणीसाठी जरांगे पाटील शांतीपूर्ण उपोषणाला बसलेले आहेत. त्यांच्या तब्येतीसाठी मी प्रार्थना चिंततो. आणि या प्रश्नावर तातडीने तोडगा निघेल अशी अपेक्षा बाळगतो. मनोज जरांगे पाटील यांनी आंतरवाली सराटी येथे सांगितले कि, मंगळवार (ता. 31) रोजी मुंबई येथे राज्यातील सर्व जिल्हाधिकारीना बोलवा व सरसकट कुणबी प्रमाणपत्र द्या, मंत्रिमंडळ बैठकित निर्णय घ्या या शिवाय हे आंदोलन थांबणार नाही, मंत्रीमंडळ बैठित निर्णय घ्या शासनाला जो वेळ पाहिजे तो दिला आहे. "मराठा समाजाला आवाहन आहे शांततेत आंदोलन करा आत्महत्या करू नका". असे मनोज जरांगे यांनी सांगितले. उपोषणाच्या 6 व्या दिवशी हि मनोज जरांगे यांनी वैद्यकिय उपचार नाकारले. समाज बांधव व महिला यांनी पाणी घेण्यासाठी मोठा आग्रह जरांगे यांना केला तेव्हा विनंतीचा मान ठेवुन दोन घोट पाणी जरांगे यांनी घेतले. या वेळी जरांगे यांना अश्रू अनावर झाले डोळ्यात पाणी आले.



# आला रे आला 'सिम्बा' आला!

आगामी 'सिंघम अगेन' (SINGHAM AGAIN) हा बहुचर्चित सिनेमा गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. लवकरच हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आता या सिनेमातील अभिनेता रणवीर सिंहचा (RANVEER SINGH) फर्स्ट लूक आऊट झाला आहे. 'सिंघम अगेन' या सिनेमात नेहमीप्रमाणे सिंघम म्हणजेच अजय देवगनच्या (AJAY DEVGN) ॲक्शनचा तडका पाहायला मिळणार आहे. पण या सिनेमाची स्टारकास्टदेखील खूपच तगडी आहे. 'सिंघम अगेन' या सिनेमात टायगर श्रॉफ, अक्षय कुमार, रणवीर सिंह आणि दीपिका पादुकोण या कलाकारांचाही ॲक्शन मोड पाहायला मिळणार आहे. आता या सिनेमात रणवीरचा लूक आऊट झाल्याने प्रेक्षकांची उत्सुकता आणखी वाढली आहे. रणवीर सिंहने 'सिंघम अगेन' या सिनेमाचं पोस्टर सोशल मीडियावर शेअर केलं आहे. पोस्टरमध्ये रणवीर सिंहचा धमाकेदार लूक पाहायला मिळत आहे. वर्दीतील त्याच्या लूकने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. पोस्टर शेअर करत रणवीरने लिहिलं आहे,"सबसे नटखट, सबसे निर्जळ...आला रे आला सिम्बा आला". रणवीरच्या या पोस्टवर चाहत्यांनी कमेंट्सचा वर्षाव केला आहे. रोहित शेट्टीने 'सिंघम अगेन' या सिनेमाच्या शूटिंगदरम्यानचे फोटो शेअर केले होते. या पोस्टरमध्ये ॲक्शनचा तडका पाहायला मिळाला. हे फोटो आणि कलाकारांचे फर्स्ट लूक पाहून प्रेक्षक आता सिनेमाची प्रतीक्षा करत आहेत. 'सिंघम अगेन' हा सिनेमा 15 ऑगस्ट 2024 रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.



# कुणीतरी येणार येणार गं!

संकेत भोसले आणि अभिनेत्री सुगंधा मिश्रा (SUGANDHA MISHRA) हे कपल सध्या चर्चेत आहे. या जोडप्याच्या घरी लवकरच एका चिमुकल्या पाहुणाचे आगमन होणार आहे.नुकताच सुगंधाचा डोहाळे जेवणाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला सुगंधा आणि संकेत यांच्या कुटुंबाने तसेच त्यांच्या जवळच्या मित्रमैत्रिणींनी हजेरी लावली. सुगंधाच्या डोहाळे जेवणाच्या कार्यक्रमाचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. संकेत भोसले आणि सुगंधा मिश्रा यांनी सोशल मीडियावर डोहाळे जेवणाच्या कार्यक्रमाचे फोटो शेअर केले आहेत. या फोटोला त्यांनी कॅप्शन दिलं, "आमचा बेबी शॉवर कार्यक्रम हा महाराष्ट्रीयन पारंपारिक पद्धतीने (डोहाळे जेवण) पार पडला. ओटी भरण, पूजा आणि बर्फी पेडा कार्यक्रम इत्यादी गोष्टी पार पडल्या. तसेच केक कटिंग देखील करण्यात आलं, डायपर चेंजिंग सारखे मजेशीर खेळ देखील आम्ही खेळलो." पुढे त्यांनी कॅप्शनमध्ये लिहिलं, "आम्ही एका स्पेशल गाण्यावर परफॉर्म देखील केलं.आम्ही हे गाणं आमच्या बाळासाठी लिहिलं आहे. हे गाणं सुगंधाने लिहिलेले आणि संगीतबद्ध केले आहे. तसेच हे गाणं आम्ही दोघांनी गायलं आहे. ते लवकरच आम्ही तुमच्यासोबत शेअर करू" संकेत भोसले आणि सुगंधा मिश्रा यांनी शेअर केलेल्या डोहाळे जेवणाच्या कार्यक्रमाच्या फोटोवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला. बेबीका धुर्वे,हेमंत थत्ते,गौहर खान, मुक्ती मोहन यांनी देखील संकेत भोसले आणि सुगंधा मिश्रा यांनी शेअर केलेल्या फोटोवर कमेंट्स केल्या आहेत.



# सारा अली खानने दाखवली केदारनाथ यात्रेची झलक!

बॉलिवूड अभिनेत्री सारा अली खान (SARA ALI KHAN) बॉलिवूडची आघाडीची अभिनेत्री आहे. आपले सिनेमे आणि अभिनयाच्या माध्यमातून तिने प्रेक्षकांचं चांगलच मनोरंजन केलं आहे. व्यावसायिकसह वैयक्तिक आयुष्यातील सर्व अपडेट्स ती सोशल मीडियावर शेअर करत असते. साराला फिरण्याची प्रचंड आवड आहे. त्यामुळे भटकंती करतानाचे फोटो आणि व्हिडीओ ती चाहत्यांसोबत शेअर करत असते. सारा अली खान आता केदारनाथ (KEDARNATH) यात्रेला पोहोचली आहे. सारा अली खानने सोशल मीडियावर केदारनाथ यात्रेचा व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये सारा अली खान लोकल ठिकाणी जेवण करताना दिसत आहे. दरम्यान तेथील एका साधुंचे ती आशीर्वाद घेत आहे. तसेच एका नदीकिनारी ती चेहऱ्यावर पाणी मारताना पाहायला मिळत आहे. त्यावेळी ती म्हणत आहे,"सकाळी-सकाळी थंड पाणी चेहऱ्यावर मारा बुद्धी तेज होईल". एकंदरीतच सारा अली खानचा केदारनाथ यात्रेचा व्हिडीओ चाहत्यांच्या पसंतीस उतरला आहे. साराने या व्हिडीओच्या बॅकग्राऊंडला 'केदारनाथ' सिनेमातील काफीराना गाणं लावलं आहे. सारा अली खानचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. केदारनाथ यात्रेदरम्यानचे साराचे फोटो आणि व्हिडीओ चाहत्यांच्या पसंतीस उतरले आहेत. पण हा व्हिडीओ पाहिल्यानंतर चाहत्यांना मात्र सुशांत सिंह राजपूतची आठवण आली आहे. सारा अली खानने शेअर केलेल्या व्हिडीओवर चाहते,"ईस्ट असो वा वेस्ट सारा अली खान बेस्ट आहे, व्हा दीदी सुशांत सिंह राजपूतची आठवण आली, काफीराना गाणं ऐकल्यानंतर सुशांतची आठवण आली नाही असं होत नाही, हर हर महादेव, अशा कमेंट्स करत आहेत.



# महाराष्ट्राची तेजस्वी कामगिरी!

## » ॲथलेटिक्समध्ये एकूण 10 पदकांची कमाई

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**महाराष्ट्राच्या क्रीडपटूनी ३७व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सोमवारी ॲथलेटिक्स, टेबल टेनिस, जलतरण, बिलियर्डस-स्नूकरमध्ये तेजस्वी कामगिरीची छाप पाडताना ३ सुवर्ण, ४ रौप्य आणि ३ कांस्य अशी एकूण १० पदकांची कमाई केली. त्यामुळे आतापर्यंत ४९ सुवर्ण, ३३ रौप्य आणि ३४ कांस्यपदकांसह एकूण ११६ पदके मिळवत पदकतालिकेतील अग्रस्थान कायम राखले आहे. हरयाणा दुसऱ्या आणि सेनादल तिसऱ्या स्थानावर आहे.**

ॲथलेटिक्समध्ये महाराष्ट्राने दोन सुवर्ण, एक रौप्य आणि एक कांस्य पदक पटकावले. तेजस शिरसेने लागोपाठ दोन स्पर्धा विक्रम नोंदवत ११० मीटर्स अडथळा शर्यतीत सुवर्णपदक जिंकले. महिलांच्या गोळाफेकीत आभा खातुआने सुवर्णवेध घेतला. सेजल सिंगने २० किलोमीटर चालण्याच्या शर्यतीत रौप्य पदक जिंकले, तर ४०० मीटर्स धावण्याच्या शर्यतीत राहुल कदमने कांस्य पदक जिंकले. आंतरराष्ट्रीय टेबल टेनिसपटू दिया चितळेच्या शानदार कामगिरीच्या बळावर महाराष्ट्राच्या महिला संघाने टेबल टेनिसमध्ये सुवर्णपदकावर नाव कोरले. महाराष्ट्राच्या पुरुष संघाला कांस्य पदकावर समाधान मानावे लागले. महाराष्ट्राच्या खेळाडूंनी बिलियर्डस आणि स्नूकर क्रीडा प्रकारांमध्ये दोन रुपेरी पदके कमावली. महाराष्ट्राच्या पुरुष हॉकी संघाने ओडिशाचा २-१ असा पराभव करून राष्ट्रीय स्पर्धेत विजयी सलामी नोंदवली. महाराष्ट्राच्या महिला संघाचे तलवारबाजी क्रीडा प्रकारातील आव्हान उपांत्यपूर्व फेरीत संपुष्टात आले. महाराष्ट्राच्या तेजस शिरसेने लागोपाठ दोन स्पर्धा विक्रम नोंदवत ११० मीटर्स अडथळा शर्यतीत सुवर्णपदक जिंकले आणि राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील ॲथलेटिक्समधील दुसरा दिवस गाजवला. महिलांच्या गोळाफेकीत महाराष्ट्राच्याच आभा खातुआने सुवर्णवेध घेतला. महाराष्ट्राची खेळाडू सेजल सिंग हिने २० किलोमीटर चालण्याच्या शर्यतीत रौप्य पदक जिंकले. ४०० मीटर्स धावण्याच्या शर्यतीत राहुल कदमने कांस्य पदक जिंकले. ॲथलेटिक्समध्ये सोमवारी महाराष्ट्राने दोन सुवर्ण, एक रौप्य आणि एक कांस्य पदक पटकावले. तेजसने सकाळी या शर्यतीमधील प्राथमिक फेरीत १३.८० सेकंद असा स्पर्धा विक्रम नोंदवला होता. संध्याकाळच्या सत्रात त्याने १३.७१ सेकंद असा स्पर्धा विक्रम नोंदवत सुवर्णपदक जिंकले. त्याने उत्कंठापूर्ण झालेल्या शर्यतीत ओडीशाचा जीवा ग्रेशनसन (१४.१३ सेकंद) व राजस्थानचा माधवेद्र सिंग (१४.१९ सेकंद) यांना पराभूत करीत विजेतेपद पटकावले.




तेजस हा औरंगाबादचा खेळाडू असून त्याला सुरेंद्र मोदी यांचे मार्गदर्शन लाभले आहे. यंदाच्या मोसमात त्याने अनेक स्पर्धांमध्ये अव्वल दर्जाचे यश संपादन केले आहे. त्याने जूनमध्ये आयोजित करण्यात आलेला आंतरराज्य स्पर्धेतही या शर्यतीत सुवर्णपदक नोंदवले होते. यंदा मे महिन्यात आयोजित करण्यात आलेल्या फेडरेशन चषक स्पर्धेत नोंदवलेली १३.६१ सेकंद ही त्याची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी आहे.

महाराष्ट्राची खेळाडू सेजल सिंगने २० किलोमीटर चालण्याच्या शर्यतीत रौप्य पदक जिंकले. तिने ही शर्यत एक तास ४१ मिनिटे १३ सेकंदात पूर्ण केली. या शर्यतीमध्ये उत्तर प्रदेशची ऑलिम्पिक धावपटू प्रियांका गोस्वामीने अपेक्षेप्रमाणे सुवर्णपदक जिंकले. तिने ही शर्यत एक तास ३६ मिनिटे ३५ सेकंदात पार करीत नवीन स्पर्धा विक्रम नोंदविला. उत्तर प्रदेशची खेळाडू मुनिता प्रजापतीला कांस्य पदक मिळाले. हे अंतर पार करण्यास तिला एक तास ४२ मिनिटे २४ सेकंद वेळ लागला. महिलांच्या गोळा फेक स्पर्धेतील तिसऱ्या प्रयत्नात आभाने १७.०९ मीटर्सपर्यंत गोळा फेक करीत सोनेरी यश मिळवले. ती मूळची पश्चिम बंगालची खेळाडू असून मुंबईतील वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) विभागात नोकरी करीत असून ती मुंबईतच ॲथलेटिक्सचा सराव करते. तिने आतापर्यंत आशियाई मैदानी स्पर्धेमध्ये रौप्यपदक जिंकले असून अनेक राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये भरघोस पदके जिंकली आहेत. ४०० मीटर्स धावण्याच्या शर्यतीत राहुल कदमने कांस्य पदक जिंकताना ४७.१५ सेकंद वेळ नोंदवली. मुंबई येथे तो वस्तू आणि सेवा कर विभागात नोकरी करीत आहे.

### महिला संघ उपांत्यपूर्व फेरीत पराभूत

» महाराष्ट्राच्या महिला संघाचे राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील तलवारबाजी क्रीडा प्रकारातील आव्हान उपांत्यपूर्व फेरीत संपुष्टात आले. महिला सांघिक फॉइल गटात तामिळनाडूकडून महाराष्ट्राने ३५-४५ अशी हार पत्करली. महाराष्ट्राच्या संघात वैदेही लोहिया, हर्षदा दामकोंडवार, अंकिता साळुंखे आणि ज्योती सुतार यांचा समावेश होता. महाराष्ट्राने आतापर्यंत तलवारबाजीमध्ये एक रौप्य आणि दोन कांस्य अशी एकूण तीन पदके मिळवली आहेत

# पाक नंतर लंकेचा उडवला धुव्वा!

## » अफगाणिस्तानने मिळवला तिसरा विजय

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**विश्वचषक 2023 च्या 30 व्या सामन्यात अफगाणिस्तानने श्रीलंकेला पराभव केला आहे. पुण्यातील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने २४१ धावा करत अफगाणिस्तान समोर २४२ धावांचे आव्हान ठेवले होते. लंकेचे आव्हान अफगाणिस्तानने तीन गडी गमावन गाठले.**



अजमतुल्ला उमरझाईच्या नाबाद ७३ धावा आणि कर्णधार हशमतुल्ला शाहिदीच्या नाबाद ५८ धावांच्या खेळीच्या जोरावर अफगाणिस्तानने हा विजय मिळवला. विश्वचषकात अफगाणिस्तानने तिसरा विजय मिळवला. इंग्लंड, पाक नंतर लंकेचा धुव्वा उडवत अफगाणिस्तानने विश्वचषकातील तिसरा उलटफेर केला आहे.

या पराभवामुळे श्रीलंकेचा पुढचा मार्ग कठीण झाला आहे. तत्पूर्वी, पाथुम निसांका याच्या ४६ (चेंडू ६०), कुसल मेंडिसच्या ३९ ( चेंडू ५०), सदिरा समरविक्रमा याच्या ३६ (चेंडू ४०) धावा आणि आठव्या विकेटसाठी अँजेलो मॅथ्यूज आणि महेश तिक्ष्णा यांनी केलेल्या महत्वपूर्ण ४५ धावांच्या भागीदाराच्या जोरावर श्रीलंकेने २४१ धावांपर्यंत मजल मारली. अफगणिस्तानसमोर विजयासाठी २४२ धावांचे लक्ष्य ठेवले आहे. अफगाणिस्तानच्या फजलहक फारुकी ४, मुजीब उर रहमान २, रहमानउल्ला गुरबाज आणि रशीद खान यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली. श्रीलंकेला पहिला धक्का सहाव्या षटकांत २२ धावांवर बसला. फजलहक फारुकी याने दिमुथ करुणारत्नेला पायचीत (एलबीडब्ल्यू) केले. त्याने २१ चेंडूत १५ धावा केल्या. ११ व्या षटकात श्रीलंकेला दुसरा धक्का बसला. निसांका याला अजमतुल्ला उमरझाई याने गुरबाजकरवी झेलबाद केले. निसांका याने ४ चौकारांच्या सहाय्याने ६० चेंडूत ४६ धावा केल्या. श्रीलंकेने २२ षटकांमध्ये १०० धावांचा टप्पा पूर्ण केला. श्रीलंकेला २८ व्या षटकात तिसरा झटका बसला. मुजीबने कुसल मेंडिसला नजीबुल्लाकरवी झेलबाद केले. मेंडिसने तीन चौकाराच्या मदतीने ५० चेंडूत ३९ धावा केल्या.

# महाराष्ट्राची विजयी सलामी; ओडिशाचा २-१ ने पराभव!

नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज



आंतरराष्ट्रीय हॉकीपटू युवराज वाल्मिकीच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्राच्या पुरुष हॉकी संघाने ओडिशाचा २-१ असा पराभव करून राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत विजयी सलामी नोंदवली. (NATIONAL GAMES GOA 2023) म्हापसा येथील पेडे क्रीडा संकुलात चालू असलेल्या हॉकी क्रीडा प्रकाराच्या साखळी सामन्यात महाराष्ट्राकडून जुगराज सिंग आणि वेंकटेश केंचे यांनी प्रत्येकी एक-एक गोल केला. पहिले सत्र गोलशून्य बरोबरीत सुटल्यानंतर दुसऱ्या सत्रात ही कोंडी फुटली. सामन्याच्या २८ व्या मिनिटाला महाराष्ट्राला पेनल्टी कॉर्नर मिळाला. युवराजच्या पासवर जुगराजने त्याचे गोलमध्ये रूपांतर करून महाराष्ट्राचे खाते उघडले. त्यामुळे मध्यंतरीच्या काळात महाराष्ट्राकडे १-० अशी आघाडी होती. तिसरे सत्र अतिशय रंगतदार ठरले. सामन्याच्या ३३ व्या मिनिटाला ओडिशाकडून अजय कुमार एक्काने पेनल्टी कॉर्नरद्वारे गोल करून १-१ अशी बरोबरी साधली. परंतु सत्र संपण्यास दोन मिनिटे बाकी असताना वेंकटेशने मैदानी गोल करून महाराष्ट्राला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. हीच आघाडी महाराष्ट्राने मग अखेरच्या सत्रात टिकवून सामना जिंकला.